# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Karanja City**

**Date of Good Work done** :- **31/05/2022**

**Brief of the work done :-**

एका तासात आवळल्या पाकिटमारांच्या मुसक्या, पोलीस स्टेशन कारंजा शहर पोलीसांनी दिला कार्यतत्परतेचा परिचय ; दोन चोरट्यांविरोधात चोरीचा गुन्हा दाखल.

## पॉकेटमारांच्या एका तासात पोलिसांनी आवळल्या मुस्क्या

देशोन्नती वृत्तसंकलन...

**कारंजा** ■ कारंजा मुर्तीजापुर मार्गावरील रविवारी २९ मे ला बाबासाहेब धाबेकर सभागृहात नाथ मेळावा आयोजीत करण्यता आला होता. या मेळाव्याला प्रमुख अतिथी म्हणुन राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री उपस्थित असल्याने एक व्यक्ती निवेदन देण्याकरीता त्यांच्या जवळ गेला असता दोन पॉकेटमारांनी त्या व्यक्तीच्या खिश्यातील मोबाईल चोरला.

सदर प्रकरणी विजय वासुदेवराव मोडक यांनी शहर पोलिसांत तक्रार दाखल केल्याने अवघ्या एका तासात मोबाईल चोरणाऱ्या चोरट्यांच्या मुस्क्या आवळुन शहर पोलिसांनी आपल्या कार्यतत्परतेचा परीचय दिला. रविवारी सकाळी ११वाजता मोडक नामदार बच्चु कडु यांना निवेदन देण्याकरीता व्यासपीठावर गेले असता त्यांच्या खिश्यातील रेड मी कंपनीचा नोट १० हा मोबाईल चोरटयानी लंपास केला. अशा आशयाच्या मोडक यांच्या फिर्यादीवरून आरोपी जावेद खान शरीफ खान रा. संभाजीनगर दिग्रस व अयुब करीम गारवे रा. गवळीपुरा दिग्रस या दोघांविरूध्द भादविच्या कलम ३७९ व ३४ नुसार गुन्हा दाखल करून अवघ्या एका तासात दोघांनाही अटक केली. हे कारवाई ठाणेदार सोनोने यांच्या मार्गदर्शनात शहर पोलिसांनी केली. (ता.प्र.)